# आंतरविद्युत कंपनी नाटयस्पर्धेत ‘ती रात्र’ व ‘अचानक’ विजयी

## आंतर विद्युत कंपनी नाटयस्पर्धा
## जानेवारी २००९ अंतिम निकालपत्र

| | |
|---|---|
| नाटक निर्मिती- | प्रथम- ‘ती रात्र’ |
| | द्वितीय- ‘अचानक’ |
| दिग्दर्शन - | प्रथम- ‘ती रात्र’- शेखर लाड |
| | द्वितीय- ‘वाळूचं घर’- सतिश खेकाळे |
| अभिनय पुरुष- | प्रथम- ‘ती रात्र’- सेल्समन- हेमंत पाटील |
| | द्वितीय- ‘अचानक’- अब्बास- भास्कर शेगोकार |
| अभिनय महिला- | प्रथम- ‘ती रात्र’- रजनी- अमृता संकपाळ |
| | द्वितीय- ‘वाळूचं घर’- क्षमा- मंजुषा देव |
| नेपथ्य- | प्रथम- ‘ती रात्र’- संजय राऊळ |
| | द्वितीय- ‘सामसूम’- सीदमूल/ डांगरे |
| प्रकाश योजना- | प्रथम- ‘ती रात्र’- नरेंद्र पाटील |
| | द्वितीय- ‘अचानक’ - चंद्रकांत सोरटे |
| संगीत- | प्रथम- ‘ती रात्र’- हेमंत दिक्षित |
| | द्वितीय- ‘वाळूचं घर’- अशोक शेगोकर |
| रंगभुषा व वेशभुषा - | प्रथम- ‘ड्रीम ऑफर’- गीता कटारे / निलीमा ठोंबरे /मोनिका शिवहरे |
| | द्वितीय- ‘सामसूम’- सौ. घाडगे / सौ. स्नेहल कुलकर्णी |
| लक्षवेधी - | स्त्री- ‘ड्रीम ऑफर’- सौ. प्रतिभा वाले |
| | पुरुष- ‘सामसूम’- विठू- श्री. डी.एन. कोंगारी |
| कर्मचारी लेखक - | ‘ड्रीम ऑफर’- सौ. जयश्री गोरे |
| युवा कलाकार- | ‘ड्रीम ऑफर’- आदिती- मेघा भट |
| | ‘अचानक’- सरीन- नेहा सुर्जीकर |
| | ‘या अल्लाह हे राम’- रुबीना- मोनाली मेश्राम |
| उत्तेजनार्थ- | ‘अचानक’- राज- अनिल जोशी |
| | ‘या अल्लाह हे राम’- रॉबीन- डी.पी. सालूरकर |
| | ‘ती रात्र’- राजन- संदीप वंजारी |
| | ‘सामसूम’- अरविंद- एस.के. सावंत |
| | ‘ड्रीम ऑफर’- बाबा- अभिजीत शिवहरे |
| | ‘वाळूचं घर’- क्षितीज- अरविंद लोंढे |



कोराडी औ.वि.केंद्राच्या द्वितीय पुरस्कार प्राप्त ‘अचानक’ या नाटकातील एक रोमांचक क्षण




नाट्यस्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी डावीकडून सर्वश्री.अरविंद बागडे, एल.आर. कडाव, सुरेश नारखेडे, एस.एच. डोंगरे, मोहम्मद एहफाज व अनिल मुसळे

राज्यातील वीजक्षेत्रात अग्रेसर असणाऱ्या महानिर्मिती-महावितरण व महापारेषण या तीनही कंपन्यांच्या कर्मचाऱ्यांसाठी आयोजित अंतिम नाटयस्पर्धेत महावितरणच्या भांडूप परिमंडळाच्या ‘ती रात्र’ या नाटकाला प्रथम क्रमांक तर महानिर्मितीच्या कोराडी औ.वि.केंद्राच्या ‘अचानक’ या नाटकाला द्वितीय क्रमांक मिळाला. दिनांक २९ जानेवारी रोजी येथे संपन्न झालेल्या पुरस्कार वितरण सोहळयात विजयी नाटय संघांना व स्पर्धकांना गौरविण्यात आले. नागपूर येथील वसंतराव देशपांडे नाटयगृहात २७ ते २९ जानेवारी दरम्यान संपन्न झालेल्या या स्पर्धेत तीनही कंपन्यांतर्फे एकूण सहा नाटके सादर करण्यात आली होती.

पारितोषिक वितरण समारंभाच्या अध्यक्षस्थानी कोराडी औ.वि.केंद्राचे मुख्य महाव्यवस्थापक श्री.एल.आर. कडाव, तर प्रमुख अतिथी म्हणून महापारेषणचे मुख्य अभियंता मोहम्मद एहफाज हे उपस्थित होते.

यावेळी रंगमंचावर मान्यवरांसोबत अनिल मुसळे-सह मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी, महानिर्मिती, श्री.महादेव शिवणकर अधीक्षक अभियंता तसेच परीक्षक सर्वश्री चांदूरकर, मधु जोशी व सौ.मृणाल पुराणिक आदि उपस्थित होते.

प्रमुख अतिथींच्या स्वागतानंतर नाटयस्पर्धेचा धावता गोषवारा श्री.अनिल मुसळे यांनी सादर केला.

यानंतर परीक्षकांच्या वतीने प्रातिनिधीक मनोगत व्यक्त करताना श्री.चांदूरकर यांनी सांगितले की, या नाटयस्पर्धा राज्यस्तरीय दर्जाच्या झाल्या व यातून कलावंतांची संघभावना, अप्रतिम नाटयकलाकृती बघायला मिळाल्या. तसेच परीक्षकांच्या नजरेतून दिशादर्शक व प्रोत्साहनपर मार्गदर्शन केले. सदर प्रसंगी सहभागी रंगकर्मीच्या वतीने श्री. मिलींद रहाटगावकर यांनी मनोगत व्यक्त केले.

संपूर्ण कार्यक्रमाचे मार्मिक व आटोपशीर सूत्रसंचालन श्री.रविंद्र कटारे व चंद्रकांत दाणी यांनी तर आभारप्रदर्शन श्री. शिवणकर यांनी केले.

नाटयस्पर्धेच्या यशस्वी आयोजनाकरिता कोराडी औ.वि. केंद्राचे वरिष्ठ अधिकारी, नाटयस्पर्धा आयोजन समितीचे सर्व सदस्य तसेच महानिर्मितीचे उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी, अरविंद बागडे, सहाय्यक कल्याण अधिकारी श्रीकृष्ण वायदंडे, जनसंपर्क अधिकारी महेश आफळे, रमेश थोरात, उदय जहागिरदार इत्यादींचे सहकार्य लाभले. नागपूरमधील पत्रकार बंधूंनी ही नाटयस्पर्धा जनमानसापर्यंत पोहचविण्याकरिता केलेल्या सहकार्याबद्दल त्या सर्वांचे विशेष आभार मानण्यात आले. सौ.अंजली कुलकर्णी यांनी गायलेल्या पसायदानाने समारंभाची सांगता झाली.